**प्रेस नोट दि.१४/०३/२०१९**

**येरवडा पोलीस स्टेशन**

**जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून प्रतिकनगर, येरवडा, पुणे येथील अंगणवाडीतील महिला शिक्षक, सेविका, विद्यार्थी यांना महिला पोलीस अधिकारी यांनी महिला व बालकांचे सुरक्षा विषयक मार्गदर्शन केले बाबत.**

येरवडा पोलीस स्टेशनचे हद्दीतील सामाजिक कार्यकर्ते श्री.रवि साळवी यांनी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून, येरवडा पो.स्टे.हद्दीतील प्रतिकनगर, येरवडा येथील अंगणवाडी मध्ये अंगणवाडी शिक्षीका, सेविका व विद्यार्थ्यांकरीता कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमास येरवडा पोलीस स्टेशन कडील महिला अन्वेषण पथकाच्या महिला पो.उप.निरी. स्वप्ना वाघमारे यांना आमंत्रित केले होते.

महिला पो.उप.निरी.स्वप्ना वाघमारे यांनी म.पो.ना. सुषमा राजे यांचेसह सदर कार्यक्रमास उपस्थित राहून उपस्थित अंगणवाडी शिक्षीका, सेविका तसेच विद्यार्थ्यांना महिला व बालकांचे सुरक्षेच्या दृष्टीने अस्तित्वात असलेले कायद्यांचे तसेच त्यामधील तरतुदींची माहिती दिली. तसेच पोलीस दलाकडून महिला सुरक्षेच्या दृष्टीने राबविण्यात येणारे बडीकॉप, भरोसा सेल, दामिनी पथक तसेच विद्यार्थ्यांचे सुरक्षेकरीता पोलीस काका अशा विविध उपक्रमांची माहिती देऊन उपस्थित महिलांना शिक्षीका, सेविकांना निर्भयपणे चांगले काम करणेसाठी प्रोत्साहन दिले. उपस्थित महिला शिक्षीका व सेविकांचे वतीने महिला पो.उप.निरी. स्वप्ना वाघमारे यांचा सत्कार करण्यात आला.

अशा रितीने येरवडा पो.स्टे.कडील महिला पो.उप.निरी.स्वप्ना वाघमारे यांनी वरील संस्थेचे कार्यक्रमास उपस्थित राहून महिला व बालकांचे सुरक्षा विषयक अस्तित्वात असलेले कायदे व पोलीस दलाकडून राबविण्यात येणारे विविध उपक्रमांची माहिती देऊन चांगली कामगिरी केली आहे.

( **राजेंद्र कदम** )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे



